जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**
**प्रेस नोट दि.२९/०२/२०२४**
**दि.२८/०२/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

## भाग-१ ते ५ चे गुन्हे

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो.स्टे.२२१/२०२४,भादविक ३०७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | दिलावर सय्यद,वय ४१ वर्षे,रा.कोंढवा बु पुणे |
| **आरोपीत** | १)झैद आसिफ सय्यद वय १८ वर्षे, २) आसिफ सय्यद वय ५० वर्षे रा.आगरा हॉटेल मागे,कौसरबा कोंढवा पुणे (अटक) एक इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०२/२०२४ रोजी रात्री २२/३० वा.चे.सुमारास सार्वजनिक शौचालयाचे शेजारी समतानगर,कोंढवा पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा हा त्याचे मित्रासोबत दुचाकी गाडीवरुन घरी जात असताना यातील नमुद झैद सय्यद याने त्याला आडवुन लाथा बुक्यांनी मारहाण केल्याने फिर्यादी यांना मुलाने कॉल करुन बोलावुन घेतल्याने फिर्यादी सदर ठिकाणी जावुन झैद याला समजावुन सांगुन भांडणे सोडवत असताना झैद पळुन गेल्याने फिर्यादी व त्यांचा मुलगा त्याला पकडण्यासाठी गेले असता फिर्यादी यांचे ओळखीचा नमुद इसम आसिफ सय्यद याने फिर्यादी यांचे तोंडावर पंच मारुन आसिफ याचे मुलाने जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी रॉड फिर्यादी यांचे डोक्यात मारुन जखमी केले तसेच फिर्यादी यांचे मुलाला देखील लाथा बुक्यांनी मारहाण करुन जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.सचिन थोरात मो.नं.८६०५१९१४३६ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे.७४/२०२४,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३२ वर्षे,रा.पर्वती,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०२/२०२४ रोजी रात्रौ २१/४५ वा.ते.२२/०० वा.चे.दरम्यान दुर्गा बार समोर निलायम ब्रिजजवळ सिंहगड रोड पर्वती पुणे व एमेराल्ड हॉटेलच्या समोर गिरधर भवन चौक जवळ गुलटेकडी पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे हातातील ६५,०००/- रू किमतीचा मोबाईल तसेच इसम नामे सागर परदेशी हे एमेराल्ड हॉटेलच्या समोर गिरधर भवन चौक जवळ गुलटेकडी पुणे येथून पायी जात असताना त्याचा १०,०००/- रु.किमतीचा मोबाईल जबरदस्तीने हिसका मारुन चोरी करून घेवून गेले आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक येवले मो.नं.८८८८०२२५२/८८८८७०२२५२ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे.८५/२०२४,भादविक ४५७,३८०,५११,३४ |
| **फिर्यादी** | एक इसम वय ३५ वर्षे रा.दत्तनगर कात्रज,पुणे. |
| **आरोपीत** | दोन अज्ञात इसम |

| | |
|---|---|
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०२/२०२४ रोजी रात्रौ ०३/०० वा. ते ०३/३० वा.चे सुमारास उन्नती मोटर्स शोरुम),दांगट पार्क स्वर्णा हॉटेल शेजारी वारजे माळवाडी पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे उन्नती मोटर्स (महिद्रा शोरुम) येथे मॅनेजर म्हणुन नोकरीस आहे.वर नमुद केले ता.वेळ व ठिकाणी दोन अज्ञात इसमांनी शोरुमचे काचेचे दरवाजाला लावलेले कुलुप कशाचे कशाचातरी सहाय्याने तोडुन आतील गाडीच्या चाव्या घेऊन महिंद्रा शोरुम मधील चारचाकी गाडया गाडया चोरुन नेण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.पवार मो.नं.९९२२४२६१८२ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो.स्टे.२२०/२०२४,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | दिपक गायकवाड, वय २१ वर्षे, रा.नेहरुनगर ठाणे |
| **आरोपीत** | पती व दोन नणंद (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २७/०२/२०२४ रोजी दुपारी १२/३० वाजण्याचे सुमारास संभाजीनगर,कोंढवा बुद्रुक, येवलेवाडी रोड,पुणे येथे घडला असे. |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची बहीण पायल हि सासरी नांदत असताना,वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी,यातील नमुद इसम पती व दोन नणंद यांनी आप-आपसात संगनमत करून,तीस टोचुन बोलुन,तीचा वारंवार मानसिक व शारिरीक त्रास देऊन करून,तीचे राहते घरी गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी.स्नेहल जाधव,मो.नं.९६५७४८१७३९ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो.स्टे.१७७/२०२४,भादविक ४१९,४२०,३४ सह माहिती तंत्रज्ञान का.क. ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय २७ वर्षे, रा.आंबेगाव बुद्रुक,पुणे |
| **आरोपीत** | मोबाई धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांने फिर्यादी यांना संपर्क करुन त्यांना गुगल मॅप वरती रिव्हयु अ‍ॅण्ड रेटींग टास्क करण्याकरीता सांगुन त्याचे कमिशन मिळेल असे सांगितले. तसेच सुरुवातीला टास्कचे कमिशन त्यांना देऊन त्यांचा विश्वास संपादन केला.त्यांनतर ट्रेडर बेनेफिट मिशन टास्क करीता मोठया प्रमाणात फायदा होईल असे सांगुन बँक खात्यावरती ४७,००००/- रु.ट्रान्सफर करण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादी यांनी त्यांना ट्रान्सफर केलेले पैसे व त्याचे कमिशन त्यांना न देता फिर्यादी यांची ४,७०,०००/- रु. ची आर्थिक ऑनलाईन फसवणुक केली. |
| **त.अंमलदार** | म.पो.निरी.(गुन्हे) मंगल मोढवे,मो.नं.९८२३१७०२६२ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो.स्टे.९०/२०२४,भादविक ४१९,४२०,माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) |
| **फिर्यादी** | एक महिला वय ३० वर्षे रा.मुंढवा पुणे |
| **आरोपीत** | व्हॉटसअँप ग्रुप व टेलीग्राम ग्रुप धारक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | व्हॉटसअँप ग्रुप व टेलीग्राम ग्रुप धारक यांनी टास्क देण्याचे बहाण्याने सुरूवातीस नफा देवुन फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून बीटीसी क्रिप्टो कॉईनमध्ये गुतवणुक केल्यास भरघोस नफा मिळेल असे सांगुन फिर्यादी यांचे बँक खाते व फिर्यादी यांचे पती यांचे बँक खाते मधुन त्यांचे बँक खाते क्रमांकावर ६,४३,०००/- रूपये पाठविण्यास भाग पाडुन आर्थिक फसवणुक केली आहे आहे. |
| **त.अंमलदार** | व.पो.निरी.महेश बोळकोटगी मो.नं.९५५२५५२३८७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**